

**प्रा. सौ. हेमलता सुधाकर जोशी**
**(देशपांडे-निमोणकर), पुणे**
(स्वर्गीय नानासाहेब निमोणकरांची पणती)

# ''बैसोनि चरणी सद्गुरु साईनाथा''

**जोडोनिया कर चरणी ठेविला माथा।**
**परिसावी विनंती माझी सद्गुरु नाथा ।।१।।**
**असो नसो भाव आलो तुझिया ठाया।**
**कृपादृष्टी पाहे मजकडे सद्गुरुराया।।२।।**
**अखंडित असावे से वाटते पायी।**
**साहूनि संकोच ठाव थोडासा देई।**
**तुका म्हणे आम्ही तुझी वेडीवाकुडी।**
**नामे भवघा हाती आपुल्या तोडी....**

१४ एप्रिल १९८९ च्या रामनवमीच्या दिवशीची सर्वमंगल पहाट! पहाटेचे प्रसन्न वातावरण, आकाश निरभ्र, पक्ष्यांचे मधुर क्रूंजन! या सुंदर वातावरणात भूपाळीचे मधुर शब्दसूर संपूर्ण शिर्डीत घनगंभीरपणे घुमू लागले! साईबाबांच्या प्रमुख मंदिरात पहाटेच्या काकड आरतीला प्रारंभ झालेला होता. भावुक श्रद्धावातान भक्तांची हृदये साईंच्या प्रेमादराने ओथंबून गेली होती... सारं कसं मंगलदायी, प्रसन्न आत्म्याला जाऊन भिडणारं!!

देशपांडे या मधुर सुरांच्या तालावरच मी, माझे भाऊ, चंद्रशेखर, अनंत, बहिणी मंगल, निमो, उमा लगबगीने स्नान करून, शुचिर्भूत होऊन द्वारकामाईत प्रवेशलो! आज रामनवमी, निशाणाची महापूजा, समाधीवर निशाणे पसरणे, त्यानंतर मिरवत मिरवत द्वारकामाईवर नेणे... अशी खूप आनंददायी कामे होती...

द्वारकामाईत शिरलो तर समोर पायऱ्या चढताच साईबाबांची गादीवर ठेवलेली मोठी तसबीर लक्ष वेधीत होती. बाबा त्यांच्या गादीवर ठराविक आसनात बसलेले, भव्य कपाळावर त्रिपुंड लावलेला, मस्तकाभोवती पांढरे वस्त्र गुंडाळलेले, अंगात कफनी... आणि मोठमोठे पाणीदार डोळे रोखून शांतपणे जणू आमच्याकडे पहात होते.त्या ठाव घेणाऱ्या डोळ्यातून प्रेम, करुणा, कृपा असे सारे भाव प्रगट होऊन जणू आमच्यावर वर्षाव करु लागले होते!

'या... या माझ्या बाळांनो तुमचीच वाट पहातो आहे... खूप वेळ वाट पाहतो आहे..' असेच जणू सद्गुरु म्हणत आहेत असे वाटले. हृदयात प्रेम आणि आदराचे भाव तीव्रपणे दाटून आले. घाईघाईने त्यांच्या समोरच्या चरणपादुकांवर मस्तक नम्रपणे टेकले! अन् मला रडूच कोसळले! हुंदक्यावर हुंदके येऊ लागले. शरीरावर रोमांच उभे राहिले. आणि डोळ्यातून आश्रुपात सुरु झाला...

बाबांच्या पादुकावर जणू अश्रूंचा अभिषेकच सुरु झाला! काय घडते आहे माझे मलाच समजेना. ''साई! माझे सद्गुरु साई! बाबा खरच तुम्ही आमची एवढी वाट पहात होता? तुम्ही आमचे सद्गुरु, माता पिता सारे काही, आमचे सर्वस्व आहात, आमची गुरुमाऊली आहात...

''बाबा आज आमची ही गुरूपूजा स्वीकारा हं...' माझ्या मनात एकामागून एक असंख्य विचार लहरी निर्माण होऊ लागल्या.

दरवर्षी रामनवमीच्या पहाटकाली बाबांच्या समोर बसून साईचरित्राच्या वाचनाला प्रारंभ करण्याचा आम्हा सर्व भावंडांचा परिपाठ असतो. त्यादिवशी पोथीवाचनाला प्रारंभ करून वर्षभर नित्य पारायणे करण्याचा नियम मोठ्या प्रेमाने, चालू असतो. आश्चर्य म्हणजे ज्या ज्यावेळी शिर्डीला जाते, द्वारकामाईत दर्शनाला जाते, बाबांच्या फोटोकडे पहाते तेव्हा असेच मन भरून येते, अष्टसात्त्विक भाव जागृत होतात आणि त्यांच्या चरणावर अश्रुपात व्हायला लागतो! त्याक्षणी खूप दिवस वाट पहाणारी माझी गुरुमाऊली म्हणजे बाबा आणि मी जणू काही त्यांची मानसकन्या आहे'' असेच मला वाटते! हे भाव इतके प्रगाढ आणि अतूट आहेत की त्यामुळे सद्गुरुंचे नाते हे जन्मोजन्मीचे असते. हा संबंध पिढ्या न् पिढ्या चालू असतो याची साक्ष पुन: पुन्हा मिळते. श्री साईबाबा प्रत्यक्ष परमेश्वर असून स्वत: अत्यंत मनोभावाने केलेली प्रार्थना त्यांना पोहोचते. त्यासाठी मध्यस्थांची गरज नसते याचा अनुभव अनेक साईभक्तांना नेहमी येत असतो.

जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव। दाविसी दयाघना। ऐसी तुझी ही माव...

ईश्वरी कृपेवाचून सद्गुरुंची गाठ पडणे शक्य नाही. साईबाबांची गुरुकिल्ली निराळी आहे. एखादी कासवी ज्याप्रमाणे आपल्या पिलांकडे केवळ नजरेने, दृष्टीने पाहून त्यांचे संगोपन करते, पोट भरीत असते तसे बाबा आपल्या प्रेमळ भक्तांचे रक्षण करतात. कोणालाही प्रत्यक्ष मंत्र न देता आपल्या कृपेने त्यांनी भक्तांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे ब्रह्मानंदाचा अनुभव दिलेला आहे.

माझे पणजोबा स्वर्गीय नानासाहेब उर्फ शंकरराव रघुनाथ देशपांडे हे साईबाबांच्या अत्यंत निकटवर्तीय भक्तांमधील भक्त होते. स्व. नानासाहेब चांदोरकर, नानासाहेब निमोणकर, माधवराव देशपांडे (शामा), गोपालराव बुटी, स्व. तर्खड, दाभोळकर (श्रीचरित्राचे लेखक), कोते पाटील... अशा सर्व भक्तभंडळींवर खरोखरी बाबांची कृपा आणि अखंड नाते जडलेले आहे. त्यासर्वांनी बाबांची फार मनापासून भक्ती आणि सेवा केलेली आहे. खुद्द साईबाबांच्या हयातीतच रामनवमीच्या उत्सवाला प्रारंभ झाला त्यावेळी बाबांनी नानासाहेब निमोणकरांना एक मोठे निशाण द्वारकामाईवर लावण्याची आज्ञा केली आणि दुसरे निशाण नगरच्या दामूशेट कासारांना लावण्याची आज्ञा केली. मोठी निशाणे प्रथम बाबांच्या पुढे ठेवली जाऊन, महापूजा

झाल्यावर मोठ्या समारंभाने थाटात, साऱ्या गावातून वाजत गाजत मिरवली जातात. बँड, ताशांचे निनाद घुमतात, निशाणे नाचवली जात, असंख्य भक्तांच्या मिरवणुकीबरोबर संध्याकाळी ७ वाजता द्वारकामाईवर चढवली जातात आणि वर्षभर मोठ्या दिमाखाने फडकत रहातात. निशाणांची पूजा, महापूजा झाली की रामनवमीच्या उत्सवास प्रारंभ होतो. असा हा कार्यक्रम मेळा ११४ वर्षे अखंड आणि अव्याहतपणे शिर्डीला चालू आहे!

स्वर्गीय नानासाहेब देशपांडे हे संगमनेर तालुक्यातील निमोण गावाचे वतनदार देशपांडे होते. नानासाहेब तालुक्यातील पुढारी गृहस्थांमध्ये मोडत असत. ब्रिटिश सरकारने त्यांना ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमले होते. शिर्डीला आल्यावर साईनाथ महाराजांचा अत्यंत निकट सहवास त्यांना लाभला. महाराजांवरची त्यांची श्रद्धा आणि भक्ती एवढी प्रगाढ होती की त्यांनी आपले वास्तव्य निमोण सोडून शिर्डीतच पत्नीसह केले. आयुष्याची शेवटची वर्षे बाबांशिवाय दुसऱ्या कशातच व्यतीत केली नाहीत. स्नानसंध्यादि कर्मे करण्यासाठी फक्त घरी जात. उरलेला सर्व वेळ फक्त बाबांची सेवा हेच आयुष्याचे ध्येय झाले! साठी उलटली तरी आळस आणि विश्रांती महित नव्हती. साईबाबा त्यांना मोठ्या प्रेमाने 'हे म्हातारेकाका' म्हणत असत. महाराजांचे पश्चात ते फार दिवस राहिले नाहीत. शेवटचे तीन दिवस फक्त साईबाबांचा ध्यास लागलेला होता. सर्वत्र साईबाबांचीच जाणीव फक्त उरलेली होती. येणाऱ्या प्रत्येकाला 'या साईबाबा म्हणत. पत्नीने वस्तुस्थिती सांगताच, तिला पण ते 'या साईबाबा' म्हणाले, तुझ्यारुपात साईबाबाच आहेत असे तिला म्हणत. अशारितीने अखंड साईस्मरणातच त्यांना बाबांनी शेवटी आपल्या चरणणाशी नेले...

द्वारकामाई ही जुनी मशिद असताना तिचे पुन्हा बांधकाम करण्याचे कार्य नानासाहेब चांदोरकरांनी स्वीकारले. पण कामामुळे सवड होईना तेव्हा निमोणकरांना विनंती केली. नानासाहेबांनी पण ते कार्य मोठ्या प्रेमाने स्वीकारुन जातीने बांधकाम सुरु केले. पण साईबाबा झालेले बांधकाम पाडून टाकायचे, दगड भिरकावून द्यायचे! नानासाहेब निमोणकरांची ती सत्त्वपरीक्षाच असे! तेही तेवढ्याच शांतपणे, चिकाटीने पुनश्च हरि ओम' या न्यायाने बांधकामाला परत सुरवात करायचे! शेवटी द्वारकामाईचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले... नानासाहेबांनी साईबाबांचा प्रसाद घेण्यासाठी आलेल्या भक्तमंडळींना जेवायला वाढणे यासारखी कामेपण अत्यंत प्रेमाने केलेली होती... साईंच्या जवळ येण्याचा, त्यांच्या परीक्षांना त्यांनी त्यांच्या भक्तीने आणि श्रद्धेने उत्तरे दिलेली आहेत! मशिदीमध्ये रात्री साईबाबांच्या बरोबर चर्चा, सत्संग होई, संभाषणे होत. त्यामध्ये म्हाळकापती, निमोणकर, चांदोरकर, भागोजी या सर्वांना त्यात भाग घेण्याची कृपा आणि संधी वारंवार मिळत असे. कारण साईंचे गुरुंचे नाते जन्मजन्मांतरीचे होते!

आमच्या घरी साईबाबांचे दररोज नित्य पूजन आणि आरती होते. 'साईचरित्राचा' अध्याय नियमित वाचला जातो. घरातील सर्व शुभ कार्यात बाबांचे प्रथम पूजन केले जाते. ते 'आमचे सद्गुरु' आमचे सर्वच आहेत! माझे आजोबा म्हणजे स्व. नानासाहेब निमोणकरांचे पुत्र स्व. सोमनाथ शंकर देशपांडे ब्रिटिशांच्या काळात सी.आय.डी. इन्स्पेक्टर होते. भारतभर बदल्या होत असत. बाबांनी त्यांना एक विलक्षण आज्ञा केलेली होती. ते म्हणत, 'तू



**मिरवणुकीच्या वेळी आशारीतीने नमोणकरांचे निशाण नाचवले जाते. (११५ वर्षांची परंपरा)**

दर्शनाला आलास की तुझ्या बंदूकीची फैर आकाशात उडवत जा...!' त्याप्रमाणे सोमनाथांच्या बंदुकीचा आवाज ऐकला की बाबा अत्यानंदाने इतर भक्त मंडळींना सांगत की 'माझा सोमू आला'...! सोमनाथांनी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले की बाबा लगेच दक्षिणा मागायला सुरवात करायचे. 'तुझ्याजवळचे सगळे रुपये दे...' आजोबांकडून घेतलेल्या एकेका चांदीच्या रुपयाच्या नाण्यावर ते बोटांनी घासायचे, ते नाणे चोळायचे आणि बसलेल्या लोकांना वाटून टाकायचे... आजोबा एकदा त्यांना म्हणाले, ''बाबा माझ्याकडून दक्षिणा घेता आणि इतरांना प्रसाद म्हणून वाटून टाकता. पण मला मात्र कधीहि एखादा रुपया देत नाही. का बर असं करता?''

बाबांनी त्यांच्याकडे रोखून पाहिले आणि म्हणाले, ''अरे सोमू, देख. तू फकीरका पैसा कभी मत लेना... तू फकीरको पैसा देगा.. और देख, जो तुझे मिला है ना! उसमें खूश रहना.. समझे?'' काय बिशाद होती सोमनाथांची पुढे बोलण्याची निमूटपणे त्यांनी खाली मान घातली. पण खरी गंमत पुढेच आहेत. पुण्याला आल्यावर ऑफिसमध्ये बातमी मिळाली की त्यांचे प्रमोशन झाले असून पगार वाढ झाली आहे! आश्चर्य म्हणजे बाबांना जेवढी दक्षिणा दिलेली असे त्याच्या दुप्पट पगारवाढ झालेली असे. पण बाबा चांदीचे रुपये बोटाने का घासत असत?' ही शंका त्यांच्या मनात सतत कायम असे! एकदा त्यांनी न विचारताच बाबांनी स्पष्टीकरण दिले, ''तुम्ही भक्त मंडळी, उदरनिर्वाहासाठी पैसा कमावता. पण दानधर्म नियमित करीत नाही. म्हणून मी तुमच्याकडून दक्षिणा मागतो म्हणजे तो दानधर्म तुमच्याकडून करवतो. रुपये घासण्याचा

हेतू म्हणजे तुमचे प्रारब्ध, संचित कर्माचे जन्मोजन्मीचे दोष, पापे यांचा घासून घासून क्षय करतो.... त्यांचा क्षय आपोआपच होत असतो! समझे?'' यावरून आपल्या भक्तांच्या कल्याणाची केवढी आस्था आणि कळकळ होती, हे सिद्ध होते. बाबांचे गूढ सांकेतिक बोलणे आणि कृती यामागे संदेश खरोखरीच असे फार मार्मिक, गूढ आणि उदात्त स्वरुपाचे असतं' यात शंकाच नाही.

माझे वडील स्वर्गीय गोपाळ सोमनाथ देशपांडे यांनी पण आयुष्यभर साईबाबांची अत्यंत निष्ठेने भक्ती केली. ते अहमदनगर येथे सिनियर पोलिस प्रॅसिक्यूटर होते. इंग्रजी आणि संस्कृत भाषेवर त्यांचे फार दांडगे प्रभुत्व होते. कोर्टामधील त्यांची इंग्रजीतून भाषणे (Legal Arguments) फार गाजलेली होती. सर्व वकिल लोकांना तो एक आदर्श वस्तुपाठच असे. माझ्या वडिलांना सुद्धा लहानपणी साईबाबांचा जवळचा सहवास लाभलेला होता. साईबाबांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले होते. ते लहान असताना साईबाबांनी त्यांना मांडीवर घेऊन शाल अंगावर घातली आणि 'याला एकनाथ म्हणत जा रे...'' असे म्हणून त्यांचे नामकरण केलेले होते. आजोबांच्या बरोबर ते नेहमी साईबाबांकडे जात असत. बाबांच्या मांडीवर बसून खाऊ खाणे, बाबांनी हंडीत शिजवलेला भात त्यांच्याच हातून प्रसाद म्हणून खाणे'' असे अनुभव त्यांनी अनेक वेळा घेतलेले होते.



आम्ही त्यांना प्रश्न विचारायचो, ''कसे होते हो साईबाबा?'' तेव्हा ते वर्णन करताना वडिलांचा आवाज भरून येत असे. डोळ्यात अश्रू येत. ''अरे काय सांगू तुम्हाला, बाबांचे व्यक्तिमत्त्व इतके देखणे होते की बस्स! बाबा उंच, गोरेपान, अंगाने सशक्त होते! अंगातील कफनी आणि डोक्यावरचा पांढरा रुमाल त्यांना फार शोभून दिसायचा. पण बाबांचे डोळे अत्यंत आकर्षक मोठे आणि पाणीदार होते! त्यांच्या सर्व चेहऱ्यावर एक विलक्षण तेज आणि डोळ्यात चमक असे! येणारा प्रत्येक भक्त अगदी सहजतेने त्यांच्याकडे आकर्षित होत असे... या सर्व गोष्टी आम्ही आमच्या आजोबांच्या, वडिलांच्या मुखातून अनेक वेळा ऐकलेल्या आहेत त्यांची चर्चा केली आहे. मनापासून एकेल्या आहेत. आणि त्यात रंगून गेलो आहोत. साईबाबांना आम्ही प्रत्यक्ष पाहिले नसले तरी त्यांची दिव्य मूर्ती त्यांचे देवत्व अशारीतीने लहानपणापासूनच हृदयाच्या गाभ्यावर, मनमंदिरात ठसलेले आहे... त्यांचे जागृत चैतन्य, ते स्वत: जणू सतत आपल्या बरोबरच आहेत 'हा भाव' ही श्रद्धा मनात सतत जागी असते. संकटात साथ करते, स्फूर्ती देते!

म्हणून द्वारकामाईत गेल्यावर बाबा आपली वाट पहात आहेत असे सारखं वाटते! त्यांचे पाणीदार डोळे हृदयाचा ठाव घेतात. त्यांच्या पादुकांवर मस्तव ठेवले की शरीरावर रोमांच उभे राहतात. अश्रुपात होतो कारण बाबांचा आणि आपला जन्मजन्मीचा ऋणानुबंध आहे. अतूट नाते आहे, गुरुशिष्यांचे प्रे आहे याची ती जाणीव जणू काही ते करून देत असतात अशी माझी मनोम दृढ श्रद्धा आहे! सध्या रामनवमीला शिर्डीत निशाण पाठवणे, समारंभपूर्व द्वारकामाईत वर चढणे, मिरवणू काढणे हे कार्य माझे बंधू चंद्रशेख गोपाळ देशपांडे आणि अनंत गोपाळ देशपांडे हे करीत आहेत.

'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' हा साईबाबांचा अनुभव मी स्वत घेतलेला आहे. तो कसा याचे वर्ण करण्याचा मोह आवरत नाही. २ नोव्हेंबर २००४ साली अगर कडाक्याच्या थंडीच्या दिवसात म आणि माझे पती श्री. सुधाकर जोश हिमालयामध्ये द्वाराहाट याठिकाण त्रिशूल, शिखराच्या जवळ असलेल महावतार सद्गुरु बाबाजींच्या प्राच गुहेमध्ये दर्शनासाठी गेलो होतं महावतार बाबाजी हे क्रियायोगा मूळगुरु असून त्यांचे चैतन्य शाश्व चिरंतन स्वरुपात या संपूर्ण विश्व आधिपत्य गाजवित आहे. त्यांचे व ३००० वर्षांपेक्षा जास्त आहे. ज्या ज भाग्यवान लोकांना, उदा. लाहि महाशय, परमहंस योगानंद, श्री स्वा युक्तेश्वरगिरी त्यांचे दर्शन झाले ते प भाग्यवान होते. त्यांच्या द्व क्रियायोगाचे महान कार्य बाबाजींनी करून घेतले. खुद्द साईबाबा सु क्रियायोगीच होते! बाबाजींचे वर्णन करताना ते २५ वर्षांच्या युवकासार अत्यंत देखणे दिसतात. जगातील सर्व भाषात बोलतात. अदृश्य रुपाने आप कार्य करतात असे केले जाते.

त्या गुहेकडे जाणारा मार्ग अत्यंत धोक्याचा आहे. एकीकडे गगना भिडणारी हिमालयाची उत्तुंग शिखरे, उंच, विशाल वृक्षराजी आणि दुसरीक हजारो फूट खोल दऱ्या, पाण्याचे वेगाने वहाणारे जलाशय, नद्या... र तुमचे पाऊल निसटले की तुमचा अवतार खोल दरीत पडूनच संपणार! 'मृ हाच तुमचा शेवट होणार! बद्रीकेदार सारखे घोडे, कंड्या, माणसे काहं नाही. एक हिमाचल प्रदेशातील १२ वर्षांचा मुलगा आमचा गाईड म्ह

आमच्या द्वाराहाटच्या स्वामींनी बरोबर दिलेला. आम्ही दोघे शांतपणे त्यांच्या मागून जात होतो. दुपारी गुहेत पोहोचलो. ध्यान केले. ४ वाजता निघालो आणि सारे वातावरण बदलले! बघता बघता आकाशात मेघ दाटून आले, गारा पडायला लागल्या. सगळीकडे बर्फ पडायला लागले, क्षणात अंधार पडला.. अशावेळी हिमालयात खरोखरीच फार धोकादायक वातावरण असते... कडाक्याची थंडी, मार्ग लवकर सापडत नाही. श्री स्वामी समर्थ, श्री स्वामी समर्थ, श्री बाबानी समर्थ असा आमचा जप चालला होता. त्या वातावरणात आमचाच आवाज घुमत होता. मला तर खूप भीती वाटायला लागली... आणि मग! त्या घनदाट अंधारात 'मशालीचा उजेड' दिसला. कुणीतरी मशाल घेऊन आमच्या दिशेने येत होते... में केशरसिंग हूँ।

'आप कौन है जी? अरे इतनी रातमें हिमालयसे ऐसा चलना बहुत खतरनाक है... थक गये ना? चलो मेरे साथ..' असे म्हणून तो आमचा मार्गदर्शक झाला. त्याच्या मागोमाग धडपडत, ठेचकाळत आम्ही चालत राहिलो. शेवटी एकदाची त्यांची झोपडी आली. अंधारात सरपटत एस्किमो लोकांप्रमाणे त्या झोपडीत प्रवेश केला.. त्याच अवस्थेत मानवर उचलली, समोर पाहिले! आता आश्चर्याने थक्क होण्याची माझी पाळी होती....!!

त्या झोपडीत समोरच एक मोठे कॅलेंडर लावलेले होते. त्यात साईबाबांचा पूर्ण उभा फोटो, हात आशीर्वाद देण्याच्या! स्थितीत असलेला होता. त्या हातातून तेज बाहेर पडते आहे. साईबाबांच्या डोळ्यात तेच द्वारकामाईमधील फोटोतील भाव प्रेम, करुणा आणि मी तुमचीच वाट पहात आहे!'' जणू आम्हाला म्हणत होते, ''या बाळांनो या... मी तुमचीच वाट पहात आहे!'' आता मात्र त्याच अवस्थेत व माझी गुरुमाऊली माझे साईबाबा म्हणून त्यांच्या पायावर लोटांगण घातले! हिमालयातील प्रचंड वादळी संकटापासून त्यांनीच रक्षण केले, त्यांनीच केशरीसिंगला पाठवून या झोपडीत आणले यात शंकाच नव्हती! ती संपूर्ण रात्र आम्ही दोघांनी ओल्या जमिनीवर साईबाबांच्या चरणी शांतपणे गाढ झोपेत काढली. केवढे संरक्षण! केवढा दिलासा! सद्गुरुंकडे म्हणजे जणू काही मी माझ्या माहेर घरीच आले होते! गुरुमाऊलीने यापेक्षा आणखी कोणती श्रेष्ठ अनुभूती द्यायची? हिमालयातील त्या झोपडीतील साईबाबांचे चित्ररुप दर्शन ही माझ्या आयुष्यातील एक चिरस्मरणीय घटना, फार मौल्यवान अनुभव आहे.!!

साईबाबांची भक्ती का करायची? त्यांना सर्वार्थाने शरण जाऊन प्रेमाचे जन्मजन्मांतरीचे नाते का जोडायचे असते? साईबाबा हे साक्षात मोक्षगुरु आहेत. गुरुंचे दोन प्रकार असतात. नियत गुरु आणि आनियत गुरु. नियत गुरुंचे कार्य दैवी संपत्ती परिपक्व करणे, अंत:करण निर्मल करणे पण अनियत गुरुंचे कार्य म्हणजे मोक्षाच्या मार्गी लावणे. द्वैत जाऊन ऐक्य निर्माण करणे. ''तत्वर्मासिस' या महावाक्याची साक्ष देणे. साईबाबा हे असे मोक्षगुरु आहेत याची अंतरात सतत जाणीव असावी. सर्व प्रकारचे इतर मार्ग सोडून साईबाबांचे निरंतर साई साई म्हणत नामस्मरण केले तर हा संसाररुपी महासागर बेडा सहज पार होईल! बाबा फक्त प्रेमाचे श्रद्धेचे भुकेले आहोत. सबुरी आणि श्रद्धा हा त्यांचा महामंत्र आहे. त्यांच्याजवळ मागणे मागायचे ते जन्मोजन्मी अतूट राहणाऱ्या, अढळ आणि चिरंतन प्रेमाचे आणि कृपेचे दान हीच जीवनाची आस असली पाहिजे. भौतिक गरजा पूर्ण करण्याच्या धर्मसंकटात सद्गुरुंना टाकू नये. तिथे पाहिजे फक्त शुद्ध आणि सात्त्विक अपेक्षा विरहित प्रेम Unconditional Love!

सर्व भक्त साईबाबांची पूजा करीत. कुणी गंधा अर्चन, चरण प्रक्षालन, महानेवैद्य अर्पण करीत तर तांबूल देत, सनया, चौघडे, मंगलवाद्यांचे गजर चालत. पण बाबा मस्तकाला, कपाळावर गंध मात्र लागू देत नसत. एकदा डॉ. पंडित दर्शनाला गेले असताना दादांच्या हातातील गंधाची तबकडी हातात घेऊन बाबांच्या जवळ जाऊन त्यांचे मस्तक आपल्या हातात जवळ घेऊन उजव्या हाताने मोठ्या प्रेमाने त्यांनी त्यांच्या कपाळावर त्रिपुंड रेखला. बाबांनीही शांतपणे काढून घेतला. बाकीचे भक्त गण अवाक होऊन भीतीने पहात होते. आता साईबाबांचा क्रोधाचा महासागर उसळणार! पण असे काही घडले नाही. दादांनी स्पष्टपणे कारण विचारताच बाबा तत्परतेने उत्तरले, ''अरे दादा, त्याचा गुरु ब्राह्मण आहे. मी असा हा मुसलमान जातीचा! पण पंडिताने मात्र मी त्याचा गुरुच आहे या भावनेने अत्यंत प्रेमाने माझे हे पूजन केले. त्याच्या मनाचा शुद्ध भाव मी जाणला. आपण माठे पवित्र ब्राह्मण, हा अपवित्र यवन ही शंकाच त्याच्या मनात आली नाही. त्याच्या भक्तीभावापुढे मी हार खाल्ली. त्याने मला फसवले मी 'नको' म्हणून शकलो नाही. मग राग तर दूरच राह्यला!

असे प्रेमळ सद्गुरु पाठीशी, पाठीराखे असताना जीवनात केवढा आनंद, आत्मविश्वास प्राप्त होतो याचे वर्णन शब्दातीत आहे! आज सारे जीवन फक्त साईमय झाले आहे. पहाटे त्यांचे ध्यान करताना, स्मरण करताना लागणारी भावसमाधी हा एक सुंदर अनुभवाचाच विषय आहे. साईबाबा प्रत्यक्ष आपल्या जवळ आहेत ही जाणीव केवळ आतुलनीय असते. त्यांना वंदन करताना प्रेमाचा अश्रुपात होतो, आणि हृदयाच्या गाभ्यातून सूर उमटतात...

''स्मरण साईंचे मनात होता ॐकाराचा नाद घुमला<br>
गूढ गंभीर प्रणव निनादे लाट उसळू लागल्या.. लाटा उसळू लागल्या<br>
आसनी ध्यानस्थ मी कंपित झाला मन गाभारा<br>
*ॐकार साईनामाचा होता देह डोले पुरा*<br>
*ॐकाराच्या गूढतरंगी घुमे सूर बासुरीचा*<br>
*दुमदुमती दाही दिशा नाद घनगंभीर घंटांचा*<br>
*मधुर सुरांच्या तालावरती नर्तन मोहक रंगांचे*<br>
*चमचम चमके नील पटलमय अंत:चक्षूंचे*<br>
*ध्यान मंदिरी अपूर्व रंगला एक जलसा अद्भुत*<br>
*ॐकार साईस्पर्शे भावचित्त मम तृप्त...*<br>
*साईचरणी स्मरण करीता झाली एवढी महान किमया*<br>
*अनुभव प्रचिती त्वरित दिधली आपण सद्गुरु राया*<br>
*शरण शरण मी विनम्र चरणी तव साईराया...*<br>
*अशीच कृपा अखंड राहो मम प्रेमळ सदया...*<br>
*ॐ ओम्... ओम्.... ओम्....*

**प्रा. सौ. हेमलता सुधाकर जोशी (देशपांडे निमोणकर)**<br>
A/3 फ्लॅट नं. १० राजमयूर सोसायटी (२)<br>
एरंडवणे, कर्वेरोड, पर्सिस्टंट सॉफ्टवेअरच्या मागे<br>
पुणे ४११००४. फोन नंबर - ०२०२ - २५४४०५७६

■